अपने कार्यों को ईमानदारी और मेहनत से करने वाला हमेशा अपने कार्य में सफल होता है।

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
dainiklokaarambh@gmail.com
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २७ फेब्रुवारी २०२५ | अंक ८० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Touriism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक 1st TIME in TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# पुण्यात धक्कादायक घटना स्वारगेट बसस्थानकात शिवशाही बसमध्ये एका तरुणीवर बलात्कार

## नेमकं काय घडल?

पुण्यातील स्वारगेटसारख्या गजबजलेल्या बस स्थानक परिसरात एका तरुणीवर शिवशाही बसमध्येच लैंगिक अत्याचार झाल्याची खळबळजनक घटना घडली. सोमवारी पहाटे ५.३० वाजताच्या हा सर्व प्रकार उघडकीस आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ङ्गपीडित तरुणी स्वारगेट बस स्थानकात बससाठी थांबली होती. त्यावेळी आरोपी तिथे गेला. गोड बोलून त्याने ओळख करुन घेतली. कुठे जाता म्हणून त्याने मुलीला विचारलं. मुलीने तिला फलटणला जायच असल्याच सांगितलं. त्यावर आरोपीने सातारची बस इथे लागत नाही असं सांगितलं. त्यावर तरुणीने बस इथेच लागते असं त्याला सांगितलं त्यावर आरोपी त्या मुलीला म्हणाला की, बस इथे लागत नाही, मी तम्हाला दाखवतो असं म्हणाला. त्यानंतर ती मुलगी आरोपी सोबत बसच्या दिशेने जाताना सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहेङ्क असं पोलीस अधिका-्यांनी सांगितलं. ङ्कमुलगी बस जवळ गेल्यानंतर त्याला म्हणाली की, बसमध्ये तर अंधार आहे. त्यावर आरोपीने तिला सांगितलं की, ही रात्रीची लेट बस आहे. सगळे लोक झोपले आहेत, हवं तर तू वर चढून टॉर्च मारुन बघं. ती मुलगी बसच्या आतमध्ये जाताच त्याने मागून दरवाजा बंद करुन घेतला आणि दुष्कृत्य केलंङ्क अशी माहिती पोलिसांनी दिली.

पुण्यातून धक्कादायक घटना समोर आली आहे, पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात शिवशाही बसमध्ये एका तरुणीवर बलात्कार झाला आहे. सोमवारी पहाटेच्या सुमारास ही घटना घडली आहे. या घटनेनं खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर पुन्हा एकदा महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आता या प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. पीडित तरुणीचा वैद्यकीय अहवाल समोर आला आहे, ससून रुग्णालयानं हा वैद्यकीय अहवाल पोलिसांकडे पाठवला आहे. वैदकीय अहवालामधून धक्कादायक बाब समोर आली आहे, या तरुणीवर लैंगिक



अत्याचार झाल्याचं स्पष्ट झालं आहे. पीडितेवर एकदा नाही तर दोनदा लौंगिक अत्याचार झाल्याचं समोर आलं आहे. हा अहवाल ससून रुग्णालयानं पोलिसांकडे पाठवला आहे. दरम्यान या प्रकरणात स्वारगेट आगाराच्या नियंत्रक मोहिनी ढेरेंची देखील पोलिसांकडून चौकशी करण्यात आली आहे. ङ्कपुण्यातील मध्यवर्ती स्वारगेट बस डेपोमध्ये तरुणीवर झालेला अत्याचार ही अत्यंत गंभीर घटना आहे. राज्याचे मुख्यमंत्री बदलले पण, परिस्थिती तशीच आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न सातत्याने उपस्थित होत असून, देशात महिलांच्या सुरक्षेसाठी सरकारने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. पुण्यातील स्वारगेट सारख्या सार्वजनिक ठिकाणी असलेल्या बस डेपोवर महिला सुरक्षित नाहीयेत

### त्याला फाशीची शिक्षा करणार:

महाराष्ट्रात ही अशी दुर्दैवी घटना घडणं अतिशय क्लेशदायक आहेत, याबद्दल कोणाचंच दुमत असण्याचे कारण नाही. पण आपण सर्व काळजी घेण्याचा प्रयत्न करतोय, तरी या घटना घडत आहेत. सर्व सीसीटीव्हीची बारकाईने पाहणी करायला सांगितली आहे. तिथे सीसीटीव्हीत प्रवासीही दिसतात. स्वारगेट आणि शिवाजीनगर या बस डेपोत ठिकाणी वर्दळ असते. काहीही करुन तो आरोपी सापडला पाहिजे. त्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे. ज्या मुलीवर हा प्रसंग उद्भवला आहे त्या मुलीच्या बाबतीत ज्या काही गोष्टी करायची आहे ते करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मी त्या जिल्ह्याचा पालकमंत्री असल्याने मलाही ती गोष्ट ऐकल्यानंतर अतिशय मनस्ताप झाला, असेही अजित पवार म्हणाले.

# सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणात सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती

## ग्रामस्थांनी उपोषणाचा मार्ग सोडावा : उज्वल निकम



मुंबई : बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात महाराष्ट्र सरकारतर्फे ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून, तर अॅड.बाळासाहेब कोल्हे यांची सहाय्यक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी उज्ज्वल निकम यांच्या नियुक्तीच्या आदेशाची प्रत सोशल मीडियावर शेअर करत याबाबत माहिती दिली. संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्यादृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट मानली जात आहे. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांकडून आणि मस्साजोगच्या गावकऱ्यांनी सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांच्या नियुक्तीची मागणी लावून धरण्यात आली होती. या मागणीला अखेर यश आले आहे. उज्ज्वल निकम हे महाराष्ट्रातील अत्यंत नावाजलेले वकील आहेत. त्यांनी मुंबई बॉम्बस्फोट खटल्यासारख्या महत्त्वाचे खटले लढवले आहेत. त्यामुळे उज्ज्वल निकम हे हायप्रोफाईल वकील म्हणून ओळखले जातात. संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या



खटल्यात त्यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाल्याने आरोपींच्या अडचणीत वाढ झाली आहे. केज तालुक्यातील आवादा कंपनीकडून मागण्यात आलेल्या खंडणी प्रकरणातून संतोष देशमुख यांची ९ डिसेंबरला निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. यामध्ये विष्णू चाटे, सुदर्शन घुले आणि त्यांच्या साथीदारांना पोलिसांनी अटक केली होती. या सर्व आरोपीवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणात देवेंद्र फडणवीस यांनी एसआयटी नेमून तपासाचे आदेश दिले होत

# मिरचीच्या आडून अफूच्या झाडांची लागवड, पावणेदोन लाखांचे अफू जप्त



केज : तालुक्यातील कळंबअंबा गावात पोलीस व महसूल विभागाने संयुक्त कारवाई करत एका शेतातून मिरचीच्या रोपाच्या आडून केलेली अफूच्या झाडांची बेकायदेशीर लागवड उघडकीस आणली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उत्तम रंगनाथ मस्के (वय ७०, रा. कळंबअंबा, ता. केज) याच्यावर एन.डी.पी.एस. कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार सय्यद यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार उत्तम मस्के याने त्याच्या शेतात मिरचीच्या आडून अफूची झाडे लावल्याची माहिती मिळाली. यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाने पोलीस व महसूल विभागाने संयुक्त कारवाई केली. पोलीस, महसूल अधिकारी व पंच यांच्या उपस्थितीत मस्के यांच्या शेतात छापा टाकण्यात आला. या कारवाईत एकूण ४ किलो ३२० ग्रॅम वजनाचे अफूच्या झाडे जप्त करण्यात आले. जप्त अफूची अंदाजे किंमत १,७२,८०० रुपये असल्याचे कृषी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. सदर प्रकरणी कलम १८ एन.डी.पी.एस. कायद्यान्वये शेत मालक उत्तम मस्के याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलिसांना सीडीआर मिळत नाहीत का? खा. बजरंग सोनवणेंचा मस्साजोगमधून सवाल



केज : मस्साजोगच्या ग्रामस्थांच्या आंदोलनाचा आज दुसरा दिवस आहे. बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी मस्साजोगमध्ये आंदोलनाला भेट देत ग्रामस्थ आणि संतोष देशमुख कुटुंबीयांशी संवाद साधला. आम्ही ग्रामस्थांच्या पाठिशी असल्याचे बजरंग सोनवणे यांनी सांगितले. पोलिसांनी आरोपींना पळून जाण्यास मदत केली, असा आरोप बजरंग सोनवणे यांनी माध्यमांशी बोलताना केला. पोलिस आणि आरोपींच्या फोनचे सीडीआर काढावेत, मारेकऱ्यांना मदत करणाऱ्या सर्वांना सहआरोपी करावे, अशी मागणीही सोनवणे यांनी केली आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेला ७८ दिवस उलटूनही आरोपी कृष्णा आंधळे फरार आहे. पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन व फौजदार राजेश पाटील यांना बडतर्फ करून सहआरोपी करण्यात यावे यासह इतर मागण्यांसाठी ग्रामस्थांनी कालपासून उपोषण सुरू केले आहे.

# नेकनूर पोलिसांनी फिल्मी स्टाईलने पाठलाग करत केला गुन्हेगारांना अटक

दरोडा, अपहरणासह गंभीर गुन्हे दाखल असलेल्या दोन आरोपींना नेकनूर पोलिसांनी पाठलाग करून जेरबंद केले आहे. शहरातील महामार्गावर चोर-पोलिसांचा खेळ रंगल्यामुळे बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. सोलापूरची स्थानिक गुन्हे शाखा व नेकनूर पोलिसांनी ही कामगिरी केली आहे. बाबू आहेर (रा.बीड), अविनाश पडुळे (रा. बीड) असे दोन आरोपींचे नावे आहेत. या दोघांवर सोलापूरच्या मोहोळ पोलीस ठाण्यात दरोडा,



अपहरण, लुटमारसह गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. दोन्ही आरोपी गुन्हे करून केज मार्ग बीड जिल्ह्यात कार (एम.एच.२२, ए.एम.३४४६) ने येत होते. याची माहिती नेकनूर पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी सापळा रचून आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र दोन्ही आरोपींनी पोलिसांना पाहताच गाडीतून पळ काढण्याचा प्रयत्न केल्यानंतर त्यांच्या गाडीला पोलिसांच्या गाड्या थोड्याच अंतरावर गेल्यानंतर आडव्या लावण्यात आल्यामुळे त्यांना पकडण्यात यश आले. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी, सचिन वंजारे, बाळासाहेब ठाकणे, अब्दुल सय्यद, मुन्नतजीब अत्तार यांनी केली.

# अवैध वृक्षतोडीचा बीडमध्ये पुन्हा पुष्पाराज लाकुड तस्करी करून, सर्रास पणे छुप्या मार्गाने

## छुप्या मार्गाने लाकूड तस्करीचे वाहन बीडमध्ये होतात दाखल!

बीड मधील २५ ते ३० स्वामील मध्ये लाकड तस्करी केलेली वाहने काही छुप्या मार्गाने वनविभागाला हुलकावणी देत बीडमध्ये सर्रासपणे घेऊन येत असल्याची ही मोठ्या प्रमाणातनागरिकांत चर्चा होत आहे. त्यात लाकड तस्करांकडून पाडळशिंगी टोल नाक्यावरून पुढे येणाऱ्या प्रत्येक गाडीची नोंद होते. त्यामुळे गेवराई मार्गे येणाऱ्या लाकडी तस्करीच्या गाड्या यामादळमोही मार्गे ईटकुर नंतर हिरापूर, पेंडगाव, मंग माळापुरी मार्गे कुर्ला मार्गे एमआयडीसीत छुप्या मार्गे बीड शहरातील काही स्वामिल मध्ये पोहोचतात. तर पाटोदा तालुक्यातीलवृक्षतोडी केलेली वाहने नवगणराजुरी मार्गे सोनगाव उम्रद, तसेच शिरस मार्ग, तेथून पारगाव, खापर पांगरी, तसेच अंबिका चौक येथून बायपास रिलायन्स पेट्रोल पंप मार्गे एमआयडीसीएरियात अवैध वृक्षतोडी केलेली ही वाहने येथीलच काही स्वामींवर या छुप्या मार्गाने पोहोचतात. तर मांजरसुंबा मार्गे येणाऱ्या गाड्या तेथीलच काही मधल्या छुप्या रस्त्याने बीडमधीलस्वामीलवर प्रवेश करतात. वरील सर्व मार्गाने येणाऱ्या गाड्या सर्रासपणे वृक्षांच्या कत्तली करून अवैधरित्या पद्धतीने शहरातील काही स्वामीलवर अवैद्य वृक्षतोडीचा साठा पोहोच करतअसल्याची नागरिकांतून चर्चा असल्याने. एवढा मोठा गंभीर प्रकार बीडमध्ये जर घडत असेल तर याची माहिती वन विभागाला कशी नाही.? यामध्ये शासनाच्या आदेशाला केराची टोपलीदाखवून, शासनाच्या डोळ्यात धुळफेक करून अवैधरत्या वृक्षांच्या कत्तली करून या वाहनासह लाकड तस्करांची पाठराखण कोण करत आहे.? याची देखील सखोल चौकशी बीडचे कलेक्टर व विभागीय वन अधिकारी यांच्याकडून होणे गरजेचे आहे. कारण सर्व परिस्थिती गंबीर्याने प्रशासनाने जर घेतली तर बीड मधील होणाऱ्या बेसुमार झाडांच्या कत्तलीं आणि पुन्हाउत्मातलेला पुष्पाराज पुन्हा थांबेल. असे बीड मधील नागरिकांतून मत व्यक्त केले जात आहे.



झाडे लावा झाडे जगवा असा संदेश शासन वेळोवेळी देत असते. व त्यासाठी विविध उपाय योजना ही दरवर्षी राबवत असते. मात्र बीड मध्ये त्याचे काही उलटेच होत आहे. बीड मध्ये मोठ्या प्रमाणात अवैद्य वृक्षांची कत्तल करून, लाकड तस्करीची वाहतूक करणारी टोळी बीडमध्ये पुन्हा सक्रिय झाल्याची चर्चा होत आह कारण काही दिवसापूर्वी लाकडी तस्करी करणाऱ्या गाड्या वन विभागाच्या फिरत्या पथकाचे कर्मचारी यांनी खासबाग येथील वनविभागीय कार्यालय येथे या गाड्या कारवाईसाठी आणल्या होत्या. मात्र त्या गाड्यावर कुठलीही कारवाई न करता? त्या गाड्या एका अधिकारी आणि वनपाल यांनी अवेद्य लाकडी तस्करी केलेल्या गाड्या तश्याच लक्ष्मी दर्शनसाठी सोडून दिल्याची नागरिकांतून चर्चा केली जात आहे. सदरील लाकडी तस्करी करणाऱ्या गाड्या या वनविभागाच्या कार्यालयामध्ये कारवाईसाठी लावल्या गेल्या होत्या. मात्र त्या गाड्या वरती कुठलेही कारवाई न करता? त्या गाड्यातील झाडाला दंड न लावता? थातूरमातूर कारवाई करून? या गाड्या कोणी सोडून दिल्या अशी नागरिकांतून चर्चा होत आहे. त्यामुळे वन रक्षकच भक्षक बनत असतील तर शासनाच्या आदेशाचे काय? अशी चर्चा सद्या नागरिक करत आहेत. जर दिवसा ढवळ्या विभागीय कार्यालयतून गाड्या गायब होत असतील तर लाकड तस्कर जंगलात आणि डोंगरात किती उत्मात करून पुष्पाराज करीत असतील. अशी नागरिकातून चर्चा होत आहे. सदरील प्रकरण गंभीर प्रकाराचे वाटत असल्याने जिल्हाधिकारी आणि विभागीय वन अधिकारी यांनी या संबंधित चौकशी करून दोषी आढळून येणाऱ्या वरती कडक कारवाई करावी. अशी जनसामान्यातून मत व्यक्त केले जात आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २७ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

## अवैध उत्खनन थोपविण्याचे इशारे हवेतच!

गोळीबार वा हिंसेचे धागेदोरे लवकर गवसतात. वाळूच्या पडद्याआडचे गुन्हेगारी विश्व भयंकर आहे. त्यामागील खंडणी आणि गुन्ह्यांची संख्या जगजाहीर असल्याने त्याला ङ्गपडद्याआडफ तरी कसे म्हणावे? मध्यरात्री उपसा केलेल्या वाळूखाली दबून पाच श्रमिकांचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली. विदर्भ आणि मराठवाड्याच्या सीमेलगत जालना जिल्ह्यातील या दुर्घटनेने अपरात्रीचा निष्ठुर व्यवहार उघड झाला. टिप्परमधील वाळू निष्काळजीपणे पालथी केल्यानंतर दबलेल्या श्रमिकांच्या आक्रोशाकडे दुर्लक्ष करीत चालकाने पलायन केले. अशी रॅकेट देशभर कार्यरत आहेत. वाळू घाटांचे लिलाव होऊ न देणे, कृत्रिम टंचाई करून मोठ्या दराने विक्री, अशी कामे बिनबोभाट सुरू आहेत. या प्रवृत्तींना ठेचण्यासाठी कणखर कृती हवी. ङ्गघोषणांचा पाऊस आणि कारवाईची बोंबफ ही अवस्था व्यथित करणारी आहे. हजारो कोटी रुपयांच्या अवैध वाळू उपशयात गुंड, राजकारणी आणि पोलिसांचे संगनमत प्रभावी असल्याने अवैध उत्खनन थोपविण्याचे इशारे हवेत विरतात. नदीपात्रातील वाळू उपसण्यासाठी ग्रामसभेच्या परवानगीची अट अनेकदा पाळली जात नाही. ङ्गमहाखनिज पफ किंवा सेतू केंद्रातील नोंदणीखेरीज ग्राहकांना वाळू न देण्याचा कायदा आहे. सरकारी धोरणानुसार आधार क्रमांक दिल्यानंतर एका कुटुंबाला ५० टन वाळू मिळू शकते. मुदतवाढीसाठी तहसीलदारांची संमती लागते. वाळूधोरण चांगले आहे; मात्र अंमलबजावणीत समस्या आहेत. नदीपात्रातील वाळू वाहतुकीसाठी पिवळा ट्रॅक्टरच हवा असतो. वाहन सहा टायरचे असावे; तसेच खासगी मालमत्तेची हानी होणार नाही, याची हमी द्यावी लागते. जालन्यातील दुर्घटनेचा तपास या निकषांवर व्हायला हवा. वाळू डेपो आणि मार्गांवर २४ तास ङ्गसीसीटीव्हीफच्या खर्च निविदाधारकाने करायचा असतो. गुन्हे सिद्ध होण्यातील अडचणी लक्षात घेता सरकारी नियम धाब्यावर बसविले गेल्याचेच सिद्ध होते. या व्यवहारात घबाड गवसत असल्याने नाममात्र कारवाईला न घाबरता बेसुमार काळाबाजार सुरू असतो. वाळू तस्करांना पाठीशी घातले जाणार नाही, अशा घोषणा अनेकदा झाल्या; पण तस्करी न थांबता उलट वाळूमाफिया निब्बर बनले. सरकारी बाणा कुचकामी ठरला. तस्करीवर कारवाईचे सर्वाधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असतात. मागे मराठवाड्यात जिल्हाधिकाऱ्यांवर गाडी घालण्यासह अटकाव करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जीवे मारण्याचे प्रकार घडले. धमक्या तर नित्याच्याच आहेत. हे सारे एका सूत्रबद्ध नियोजनातून घडते. राजकीय पाठबळाखेरीज ही माणसे निडर होत नसतात. वाळूमाफियांशी हातमिळवणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई हवी. नागपुरात देवेंद्र फडणवीस यांनी वाळूच्या काळ्या बाजारावर हंटर उगारण्याची घोषणा केली होती. आज ते मुख्यमंत्री असून महसूल खाते त्यांच्याच पक्षाकडे आहे. तरीही तस्करी अक्राळविक्राळ झाली आहे. नव्या धोरणात उत्खनन करणारी आणि वाळू विकणारी व्यक्ती भिन्न असावी लागते. जिल्हाधिकाऱ्यांच्या निगराणीत वाळूचे डेपो करून ठरावीक ठिकाणीच ग्राहकांना वाळूपुरवठा करावा लागतो. त्यासाठीचे सरकारी दरही निश्चित आहेत. तरीही वाळू व्यवहारातील गुन्हे वाढत आहेत. काही बांधकाम व्यावसायिकांनी कृत्रिम वाळूचा पर्याय स्वीकारला, तरी नैसर्गिक वाळूला सर्वाधिक मागणी आहे. राज्यातील नव्या बांधकामांचा वेग अचंबित करणारा असल्याने काळ्या बाजारात खोऱ्याने पैसे कमावण्याची संधी मिळते. तस्करांना दहशत बसेल, अशी कारवाई नसल्याने मस्तवाल वळू वाढले आहेत. प्रयत्नांमधील सातत्य आणि वाळू यांचा अन्योन्यसंबध जोडणारे एक सुभाषित रुढ आहे. प्रत्यक्षात मणभर वाळूच्या अवैध वाहतुकीवर कणभरही कारवाई नसल्याचा जनतेचा त्रागा आहे. किमान प्रयत्नांमध्ये खोट दिसू नये, ही काळजी घ्यायलाच हवी. सामान्यांचे जीव चालले आहेत. सरकारने कारवाईविषयीची श्वेतपत्रिका जाहीर करावी. वाळू धोरणाचा फेरआढावा घ्यावा. माणसांच्या जीवापेक्षा मोठे काही नाही. मध्यरात्रीच्या गुन्ह्यांत बरबटलेले हात उपटून काढण्याची धडाडी दाखवावी. रक्ताळलेल्या वाळूकणांमधून साधलेला विकास मानसिक अवनती ठरेल.

## धर्ममार्तंडांनो ! अरे, आता तरी विज्ञानवादी बना

महाकुंभ मेळा २०२५ हा १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे होत आहे. प्रयागराज हे धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व असलेले महत्त्वाचे शहर आहे. ते पूर्वी प्रयाग ङ्गयज्ञस्थळफ म्हणून ओळखले जात असे. हा मेळा त्रिवेणी संगम येथे भरला, जो जगातील सर्वात मोठा सार्वजनिक मेळावा आहे. हा मेळावा गंगा, यमुना आणि सरस्वती नद्यांचा संगम असलेल्या त्रिवेणी संगम येथे दर १२ वर्षांनी भरतो, जो आध्यात्मिक नूतनीकरण आणि मुक्तीची संधी देते. या मध्ये हिंदू पौराणिक कथांमध्ये लंगर घातलेला आहे. ज्या मेळ्यात सहभागी पवित्र नदीत स्नान करतात किंवा डुबकी मारतात. गंगेत स्नान केल्याने जन्म- मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्तता होऊन पापांपासून मुक्ती मिळते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. ती धादांत फसवी आहे, खोटी आहे. पाप आणि पुण्यांचा हिशेब इथेच द्यावा लागतो, इतरत्र जाण्याची गरज नाही. मग हे मेळावे, कुंभ मेळे, यज्ञ हे कशासाठी ? कुंभमेळा हा केवळ जगातील सर्वात मोठा आध्यात्मिक मेळावा नाही. तो श्रध्दा, भक्ती आणि दैवी संबंधाच्या शोधाचा एक असाधारण संगम आहे. दर १२ वर्षांनी सर्व स्तरातील लाखो यात्रेकरु प्रयागराजला जातात. जिथे गंगा, यमुना आणि गुढ सरस्वती नदया पवित्र त्रिवेणी संगमावर एकत्र येतात. येथे ज्योतिष शास्त्रीयदृष्ट्या महत्वपूर्ण काळात ते पवित्र स्नानात स्वतःला विसर्जित करतात. ज्यावर त्यांचा विश्वास आहे की, पापे शुद्ध करण्याची, आत्म्याचे नूतनीकरण करण्याची आणि दैवाशी घनिष्ठ संबंध निर्माण करण्याची शक्ती आहे, असं असलं तरी कुंभमेळ्यात स्नान केल्यानंतर मानवाच्या प्रवृत्तीत खरच बदल घडतो का? त्याच्या वागण्या बोलण्यात, आचरणात काहीतरी फरक पडतो का? हा चिंतनाचा विषय आहे. एकंदरीत त्याच्यात काहीच फरक न पडल्याचे दिसून येते, म्हणजे जैसे तिच परिस्थिती..? ३३ कोटी देवी-देवता मोक्षदाते म्हणून गाजले आहेत, परंतू एका मार्गदात्याचा मार्ग अडवू शकले नाहीत जो आज जागतिक स्तरावर पाय रोवून तटस्थ उभा आहे, ही भारताची शोकांतिका आहे. ज्यामुळे वैदिक धर्म अडचणीत आला आहे, म्हणून कुंभमेळयाचा उपदव्याप आयोजित केला आहे. या दरम्यान एक अनुचित प्रकार घडला. नवी दिल्ली रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ आणि १४ वर प्रयागराजला जाणाऱ्या दोन गाड्या रद्द झाल्याची अफवा प्रवाशांमध्ये पसरल्याने चेंगराचेंगरी झाली. एलएनजीपी रुग्णालयाने १८ जणांच्या मृत्यूची पुष्टी केली आणि अनेक जण जखमी असल्याचे सांगितले ज्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातानंतर रेल्वेने प्लॅटफॉर्मवरील गर्दीचा ताण कमी करण्यासाठी ४ विशेष गाड्यांची व्यवस्था केली. तसेच या घटनेची उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले. पाप केल्याची भिती ज्यांना वाटते त्यांनीच गंगेत बुडी मारली, पण वास्तव वेगळंच आहे. ज्यांनी काहीच केलं नाही ती माणसं कुंभमेळ्यात किंवा गंगेत बुडी मारण्यासाठी उतावीळ झाली नाहीत, कारण ती माणसं अंधश्रध्दाळू नव्हती, तर ती विज्ञानवादी होती. पुढील काळात जगातील सर्व चळवळी, धर्म, परंपरा संपुष्टात येतील आणि विज्ञानालाही बुध्दाशिवाय चालता येणार नाही. देवी-देवतांचे पुजन करणाऱ्या भारत देशात बहुजनांच्या वागण्यात, बोलण्यात, नित्यक्रमात काही बदल झालेला आहे काय? तर उत्तर नकारार्थी मिळेल. कारण त्यापासून काहीच साध्य करता आले नाही, उलट आहारी गेल्यामुळेच कर्जबाजारी, मनशांती, समाधान वगैरे मिळेनासा झाला. एखादे कर्मकांड तर्काला पटत नाही म्हणून ते काम करु नये असे बुध्दिला वाटते पण परंपरेने चालत आल्यामुळे ते केलेच पाहिजे, असा भावनेचा हट्ट असतो अशी तर्कविहिन मानसिकता म्हणजे श्रध्दा. श्रध्दा आणि अंधश्रध्दा यात तत्वतः भेद नाही पण त्या श्रध्देपायी माणसाची लक्षणीय प्रमाणात हानी होते. त्या श्रध्देला अंधश्रध्दा म्हणता येईल, हे अधोगतीचे लक्षणच म्हणावे लागेल! समाजात दीर्घकाळ टिकून राहिलेली मोठया प्रमाणात आर्थिक हानी करणारी अंधश्रध्दा म्हणजे अंत्यसंस्कार, दशक्रिया, बारावे, तेरावे, चौदावे, मासिक श्राध्द हे विधी इतेक हास्यास्पद असतात की त्यांची निरर्थकता सहज कळते. पण परंपरेच्या दडपणामुळे आणि भयावह श्रध्देमुळे अनेकांना या विधीचा त्याग करता येत नाही. जे लोक निर्भयपणे अशा रुढी मोडतात ते उपरोक्त परंपरेच्या जोखडातून कायमचे मुक्त होतात. त्यांना कोणतीही इजा होत नाही, अनाठायी होणारा मोठा खर्च टाळता येतो, रुढी तोडल्यामुळे काहीही वाईट होत नाही, त्यासाठी विचारशक्ती जागृत ठेवली पाहिजे. माणसाला मारुन धर्म मोठा आहे असे जर वाटत असेल तर धर्मालाच नेस्तनाबूत करुन माणसाला संरक्षण दिले पाहिजे, कारण माणूसकीच धर्म आहे. रामा ! तुझी पवित्र गंगा सुरवातीपासूनच दुषित मळलेली आहे. कारण तिने पाप केलेल्या माणसाचे पाप धुतले अशी आख्या आहे. मग मी पुन्हा पाप कसे धुऊ शकते ? सरकारी आकडे बघा गंगा कशी दुषित आहे. प्रयागराजमध्ये गंगा-यमुनेचे पाणी स्नानासाठी योग्य नाही. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ म्हणजेच सेंट्रल पॉल्यूशन कंट्रोल बोर्डाने ७३ ठिकाणी पाण्याची चाचणी करून अहवाल राष्ट्रीय हरित न्यायाधीकरणाला सादर केला. प्रयागराज महाकुंभात गगा-यमुनेच्या संगमावर स्नान सुरू आहे आणि आतापर्यंत ६० कोटींहून अधीक भाविकांनी स्नान केले आहे. दरम्यान केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचा एक अहवाल समोर आला आहे. ज्यामध्ये दोन्ही नद्यांचे पाणी आंघोळीसाठी योग्य नसल्याचे म्हटले जाहे. अचानक एखादी चुक झाली तर ती सुधारण्यासाठी गंगेत बुडी मारली तर ते पाप धुतल्या जाऊ शकत नाही, ते इथेच भरुन द्यावे लागते. आई-वडिलांना, सासूसासऱ्यांना वृध्दाश्रमात ठेवून कुंभमेळयात गेलेल्या लोकांचे पाप कसे धुतल्या जाऊ शकेल ? हा विवेकी विचार तांत्रिकदृष्ट्या महत्वाचा आहे. आज आपण २१ व्या शतकात वावरत असतांना असं चुकीचं भाष्य करणं किंवा वागणं मुर्खपणाचे लक्षण नाही काय? माणसाला अंधश्रध्दा दैववादी बनविते आणि दैववाद हा नेहमी घातक असतो. कारण परिवर्तन जगाचा शाश्वत नियम आहे, तेव्हा बदलणं गरजेचं असतं. वेळेनुसार, माणसानुसार, परिस्थितीनुसार! जर स्वतःला नाही बदललं तर आपलीच किंमत आपोआप कमी होत जाते. काही बदल जाणीवपूर्वक करावेच लागतात, बाकी सर्व थोतांड आहे, हे ध्यानी ठेवावे. तेव्हा विवेकवादी, विज्ञानवादी, तर्कनिष्ट बनण्याची नितांत गरज आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अपघाताबद्दल शोक व्यक्त केला. यासोबतच त्यांनी जखमींच्या लवकर पुनर्प्राप्तीसाठी प्रार्थना केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर लिहिले: नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत झालेल्या जीवितहानीबद्दल ऐकून खूप दुःख झाले. मी शोकाकुल कुटुंबांप्रती मनापासून संवेदना व्यक्त करते

## परभाषेतही व्हा पारंगत ज्ञानसाधना करा तरी.

२७ फेब्रुवारी हा प्रसिद्ध साहित्यिक वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिवस.जागतिक मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. आज आपण परकीय भाषांना जास्त महत्त्व देत आहोत. त्यामुळे मराठी भाषेकडे होत असलेले दुर्लक्ष भाषेच्या विकासामध्ये अडथळा निर्माण करत आहे. उच्चशिक्षित व्यक्ती असो किंवा अडाणी व्यक्ती इतरांना प्रभावित करण्यासाठी आपल्या बोलण्यामध्ये तो इंग्रजी शब्दांचा प्रयोग करतांना दिसत आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु मुळात कोणतीच भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते त्या भाषेकडे पाहणा-्यांच्या दृष्टिकोन कसा आहे हे ते भाषेचा ठरविते. आज दिवसेंदिवस भयानक स्पर्धा वाढत चालली आहे. मग ती शिक्षण घेण्यासाठी असो, सरकारी नौकरीमध्ये असो, व्यवसायामध्ये असो कि इतर खाजगी कामामध्ये जर आपल्याला या स्पर्धात्म क युगात टिकायचे असेल तर परकीय भाषेचे ज्ञान असणे महत्वाचे आहे. परंतु इतर भाषांचे ज्ञान घेण्यासाठी मातृभाषेचा तिरस्कार करणे योग्य नाही. कवी कुसुमाग्रज आपल्या कवितेत लिहितात.

ङ्गपरिभाषेतही व्हा पारंगत,
ज्ञानसाधना करा तरी.
माय मराठी मरते इकडे,
परकीचे पद चेपू नका.
भाषा मरता देशही मरतो,
संस्कृतीचा ही दिवा विझे,
गुलाम भाषा होवूनी आपल्या
प्रगतीचे शिर कापू नका.ङ्ख

वर्तमान युगात मातृभाषेत शिक्षण घेण्यास किंवा मातृभाषेत बोलण्यात विद्यार्थी व पालकांना लाज वाटु लागली आहे. मुलांना नौकरी तर सरकारी शाळा, किंवा कार्यालयात हव्यात परंतु शिक्षण घेण्यासाठी खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळा, महाविद्यालयांची निवड करतात हे कशासाठी असा प्रश्न मुद्दाम माझ्या मनात पडतो?मराठी माध्यमांच्या शाळेवर असलेले शिक्षक सुद्धा आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत शिकवितात. आज जरी ही छोटीसी गोष्ट दिसत असली तरी भविष्यामध्ये याचे खुप वाईट परिणाम होणार आहेत. आपल्या मराठी भाषेला खुप मोठा वारसा लाभलेला आहे. तसेच केंद्र सरकारने देखील मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा



दिला आहे ही मराठी भाषेच्या दृष्टीने अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. मग इतके सर्व असून देखील मराठी भाषेच्या प्रती इतकी उदासीनता का दिसून येते? याचा देखील विचार काळानुरूपे होणे गरजेचे आहे. आणि भविष्यात मराठीला समाजामध्ये मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी तुमचे आमचे सर्वांचे योगदान महत्त्वाचे आहे. भाषा अनेक आहेत, परंतु ज्या भाषेत आपला जन्म झाला, जी आपली आई-बाप, इष्टमित्र, आदि हजारों वर्ष बोलत आले व जिच्याद्वारे आपण आपले नित्यव्यवहार चालवतो, त्या महाराष्ट्र भाषेचा द्वेष करता कामा नये. तिचे भाषण आपणाला सहज समजते. प्रसंगानुरोधाने ती प्रौढ, कठोर ,कोमल, कठीण, भारदस्त व चंचल स्वरूप धारण करण्यासारखी आहे. इतर भाषाप्रमाणे तिलाही आपले विचार यथास्थित प्रकट करता येतोत. तेव्हा आपले एकमेकांचे विचार हे आपल्या मायभाषेच्या द्वारे आपल्याला सर्वोत्कृष्ठ समजतील हे निर्विवाद आहे.

**चि.वाघमारे राहुल विष्णू**
**पीएच.डी. संशोधक विद्यार्थी**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर**

## गझल सम्राट ; पंकज उधास

आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचा आज पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी आजच्याच दिवशी म्हणजे २६ फेब्रुवारी २०२४ रोजी पंकज उधास यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वातील एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते. १९८६ साली आलेल्या नाम चित्रपटातील त्यांनी गायलेल्या चिठ्ठी आई है.... आई है...या गाण्याने ते घराघरात पोहचले. हे गाणे आजही तितकेच लोकप्रिय आहे. नाम चित्रपट यशस्वी होण्यात या गाण्याचा खूप मोठा वाटा होता. या गाण्यांनंतर त्यांनी हिंदी चित्रपटात अनेक गाणी गायली. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहाणी याद आई, मोहरा यासारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली व ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने. चित्रपटातील त्यांनी गायलेले गाणी लोकप्रिय झाली तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी कर्मा या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्वगायन केले मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो देखील करू लागले. त्यांचे स्टेज शो ही लोकप्रिय होऊ लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती कारण तो जमाना मोहंमद रफी आणि किशोर कुमार यांचा होता. १९७९ साली त्यांना जवाब या चित्रपटातील मितवा रे मितवा... हे गाणे गाण्याची संधी मिळाली या संधीचे त्यांनी सोने केले. हे गाणे लोकप्रिय झाल्यावर त्यांनी गझल क्षेत्रात करियर करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान त्यांनी अनेक गझल गायली. पंकज उधास यांनी एक से बढकर एक गझल गात रसिकांना मंत्रमुग्ध केले

## मराठा सेवा संघाने शंभुराजेंचा सत्य इतिहास समोर आणला - ज्ञानेश महाराव

(बीड प्रतिनिधी) मराठा सेवा संघाने शंभुराजेंचा सत्य इतिहास समोर आणला, इतिहासाला लागलेले डाग पुसून काढले, इतिहास संशोधन आणि लेखन व इतिहास तळागाळातील समाज घटकापर्यंत पोहोचवण्यात मराठा सेवा संघाची भूमि का अनन्यसाधारण आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध विचारवंत, चित्रलेखाचे माजी संपादक शिवश्री ज्ञानेश महाराव यांनी केले. मराठा सेवा संघ बीड व अंतर्गत सर्व कक्ष यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवजन्मोत्सव सोहळ्यात ते बोलत होते. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही बीड जिल्हा मराठा सेवा संघाचा शिवजन्म ोत्सव सोहळा व मराठा समाज भूषण पुरस्कार प्रदान सोहळा यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड या ठिकाणी मोठ्या थाटात संपन्न झाला. याप्रसंगी विचार मंचावर कार्यक्रमाचे उद्धघाटक म्हणुन बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शिवश्री अशोक थोरात तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवश्री डॉ. ज्ञानेश मोकाटे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पं. जिल्हा परिषद बीड हे होते, प्रमुख उपस्थिती मध्ये शिवश्री एल. पी. गळगुंडे जिल्हा कोषागार अधिकारी बीड,शिवश्री प्रविणकुमार वानखेडे गटविकास अधिकारी बीड, शिवश्री अशोक ठाकरे विभागीय अध्यक्ष मराठा सेवा संघ मराठवाडा, शिवम ती वर्षा माने प्रदेश उपाध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड महाराष्ट्र, जयश्री काकू सावंत, शिवश्री अशोक येडे पाटील जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड, शिवश्री राहुल वाईकर संभाजी ब्रिगेड, शिवश्री धनंजय शेंडगे जिल्हाध्यक्ष मराठा सेवा संघ बीड, शिवश्री ज.रा. शिंदे आप्पा , मधुकर शेळके साहेब यांची उपस्थिती होती. याप्रसंगी विविध क्षेत्रात कार्यरत समाजातील तळागाळातील




समाजघटकासाठी योगदान देणा-या सम ाजरत्नांचा मराठा समाजभूषण पुरस्कार देऊन विशेष गौरव करण्यात आला.या शिवजन्मोत्सव सोहळ्यात सामाजिक, राजकिय, शैक्षणिक व उद्योग क्षेत्रात विशेष कार्य करणारे रमेश (भाऊ) पोकळे तर वैद्यकीय क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ डॉ. शरद शिंदे यांना मान्यवरांच्या हस्ते मराठा समाजभूषण पुरस्कार देवून गौरवांकित करण्यात आले. यावेळी प्रसिद्ध विचारवंत ज्ञानेश महाराव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना ते म्हणाले मागच्या पस्तीस वर्षांमध्ये मराठा सेवा संघाने महाराष्ट्रात वैचारिक नांगरणी घडवून आणली. इतिहास संशोधन केले, इतिहास लेखन केले, सत्य इतिहास सम ोर आणला, अनेक इतिहास संशोधक, लेखक, अभ्यासक, विचारवंत, वक्ते, शिवचरित्रकार, शाहीर, कीर्तनकार घडवले व त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राला एका सूत्रात बांधणारा संतांचा आणि महापुरुषांचा सत्य इतिहास तळागाळातील समाज घटकांपर्यंत पोहोचवला, समाजप्रबोधन व समाज परिवर्तनाच्या लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली. महाराष्ट्राच्या भाळी लागलेला दंगलीचा कलंक पुसून काढला. महाराष्ट्र ाच्या सर्वांगीण जडणघडणीत मागच्या पस्तीस वर्षात मराठा सेवा संघाचे योगदान अनन्यसाधारण आहे असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठा सेवा संघाचे बीड जिल्हा सचिव प्रा. पंजाबराव येडे यांनी केले, सूत्रसंचालन मराठा सेवा संघ प्रणित संत गाडगेबाबा प्रबोधन कक्षाचे जिल्हाध्यक्ष ह भ प संतोष महाराज डोंगरे यांनी केले तर आभार मराठा सेवा संघाचे बीड जिल्हा प्रवक्ता प्रा. बापूसाहेब शिंदे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक ठाकरे, धनंजय शेंडगे, पंजाबराव येडे, ज.रा. शिंदे आप्पा, बबन तांबे, नारायण गवते, अरविंद दुबाले, बापूसाहेब शिंदे, विनोद कवडे, बिबीशन शेंडगे, संतोष म ाने, झिरपे वैभव,किरण सावंत , मधुकर शेळके, गजानन जाधव, श्रीमंत सातपुते, विकास होके, शिवाजी शिंदे, विशाल घोरड, आदिनाथ काटकर, म हादेव जोगदंड, संभाजी शिंदे यांच्यासह मराठा सेवा संघ व अंतर्गत सर्व कक्षांच्या पदाधिका-यांनी परिश्रम घेतले.

## खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी आधार संमती व ना हरकत प्रमाणपत्र २८-फेब्रुवारीपर्यत सादर करावेत

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड :-सन २०२३ या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य योजने अंतर्गत प्रति हेक्टर ५ हजार रुपये याप्रमाणे अर्थसहाय्य कमाल २ हेक्टर च्या मर्यादेत देण्यात येत आहे. अर्थसहाय्य योजनेचा लाभ घेण्यासाठी वैयक्तिक खातेदारांनी आपले आधार संमती वसामाईक खातेदारांना आधार संमतीसह ना हरकत प्रमाणपत्र शुक्रवार २८ फेब्रुवारीपर्यंत संबंधित कृषि सहाय्यकांकडे सादर करावेत. अधिक माहितीसाठी उपविभागीय कृषिअधिकारी/ तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.यासाठी खरीप २०२३ मध्ये ई-पिक पहाणी केलेले कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकरी, तसेच ज्या शेतकऱ्यांनी खरीप २०२३ मध्ये ई-पिकपहाणी पोर्टलवर नोंद केलेली नाही. तथापि ज्यांच्या खरीप २०२३ च्या सातबाराउताऱ्यावर कापूस किंवा सोयाबीन पिकाची नोंद आहे असे खातेदार, खरीप २०२३ कापूस, सोयाबीन उत्पादक वनपट्टेधारक खातेदार व कापूस/सोयाबीनउत्पादक वैयक्तिक व सामाईक खातेदार पात्र आहेत.पात्र शेतक्ऱ्यांनी ई-पिक पहाणी पोर्टलवरील यादीत आपले नाव असलेबाबत खातरजमा www.scagridbt.mahait.org या पोर्टलवर किंवा संबंधित कृषि सहाय्यक यांचेकडून करुन घ्यावी. तसेच ज्या शेतकऱ्यांनी खरीप २०२३ मध्ये ई-पिक पहाणी पोर्टलवर नोंद केलेली नाही. तथापि ज्यांच्या खरीप २०२३ च्या सातबाराउताऱ्यावर कापूस किंवा सोयाबीन पिकाची नोंद आहे, अशा शेतक्ऱ्यांनीआपल्या गावातील संबंधित तलाठी यांचेशी संपर्क साधावा. खरीप २०२३ कापूस / सोयाबीनउत्पादक वनपट्टेधारक खातेदार यांनी तहसिल/ जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## बीड जिल्हाधिकारी कार्यालयात अपंगांची जीवनावश्यक मागण्यासाठी धाव



बीड । प्रतिनिधी संतप्त झालेल्या दिव्यांग लोकांना अपंगांचे थकित मानधन व रेशनसाठी परेशान आहेत. मागील ४ महिन्यापासून मानधन न मिळाल्याने पोटाचा व दैनंदिन जीवनात अडचणी आल्या आहेत. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे तरी याकडे काळजीपूर्वक लक्ष घालून न्याय द्यावा असे अपंग जनता दलाचे कार्यकर्त्यांची मागणी असून यावेळी अलिम पठाण, नसरीन मोमीन,इतर ही पदाधिकारी उपस्थित होते, तसेच एकल संघटना रुक्मिणी नागापुरे, कौशल्य कळसुले, मंगल कानडे, सह २५ ते ३० अपंग सभासद उपस्थित होते.



पैठण ।प्रतिनिधी पैठण तालुक्यातील एक हजार हेक्टर वर शेतकऱ्यांनी टरबूज लागवड केली आहे. पण शेतकऱ्यांना काय माहीत होते की यावर्षी बाजार मार्केटमध्ये टरबुजाला भाव मिळणार नाही. पाच रुपयापासून तर वीस रुपयापर्यंत कलिंगड मार्केटमध्ये मिळत आहे. दावरवाडी बाजार मध्ये वीस रुपयाचे तीन कलिंगड भेटत होते.आज महाशिवरात्र असल्याने कलिंगड स्वस्त असल्याने लोकांनी कलिंगडाचा आनंद घेतला.मात्र टरबूज लागवडीसाठी एक एकर साठी १५ ते २० हजार रुपये इतका खर्च येत असतो पण टरबूजला यावर्षी भाव नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत येणार हे नक्की

## प्रा.टी.पी.मुंडे यांच्या हस्ते महाशिवरात्रीला फराळाचे वाटप!



परळी वैजनाथ : महाशिवरात्रीनिमित्त दरवर्षी ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे यांच्या हस्ते भाविक भक्तांना फराळाचे वाटप करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंडपणे महाशिवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सर यांच्या हस्ते भाविक भक्तांना साठी फराळाचे वाटप करण्यात येते. सोमेश्वर महाराजांची पालखी प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी जिरेवाडी येथून शिवाजी चौक परळी या मार्गावरून जाते. या पालखी सोबत येणाऱ्या भाविक भक्तांसाठी फराळाचे वाटप करण्यात आले. सोमेश्वर महाराजांच्या नामाचा जयघोष करत पालखी मार्गस्थ वैद्यनाथाकडे येते त्याचे औचित्य साधून दरवर्षी त्यांच्या वतीने फराळाचे वाटप करण्यात येते याही वर्षी ते वाटप प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाल

## जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी घेतले रेणुका मातेचे दर्शन




नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड-माहूर : नांदेडचे नवनियुक्त जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी बुधवारी दि.२६-फेब्रुवारी रोजी श्रीक्षेत्र माहूर गड येथे रेणुकामातेचे दर्शन घेऊन आरती केली.दर्शनानंतर मंदिर कार्यालयात संस्थानच्या वतीने विश्वस्त चंद्रकांत भोपी व संजय काण्णव दोन्ही विश्वास्तांनी त्यांचा सत्कार केला.यावेळी सचिव तथा सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली, कोषाध्यक्ष तथा तहसीलदार किशोर यादव, उपकार्यकारी अभियंता देवराव भिसे, शाखा अभियंता रवींद्र उमाळे, आकाश राठोड व प्रभारी पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे यांचेसह मंडळाधिकारी व महसूल अधिकारी यांची उपस्थिती होती.

# महाशिवरात्री ; शिवालय भाविकांनी गजबजली लाखो भाविक प्रभू वैद्यनाथाच्या दरबारी



परळी / प्रतिनिधी बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या परळीतील श्री वैद्यनाथ मंदिरात महाशिवरात्री निमित्त भाविकांनी मोठी गर्दी केली. प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी देशभरातून शिवभक्त परळी वैजनाथ येथे दाखल झाले होते. दर्शनासाठी देवस्थानकडून प्रतिवर्षीप्रमाणेच शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले होते. दि.२६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीनिमित्त मुखामध्ये शिवनाम व हातमध्ये बेलपान घेऊन लाखो भाविकांनी प्रभु वैद्यनाथाचे दर्शन घेतले. दरम्यान महाशिवरात्रीनिमित्त बीड जिल्ह्यातील सर्वच शिवालयात शिवनामाचा गजर झाला होता. मंदिर परिसरात पोलीस प्रशासनाकडून तगडा बंदोबस्त करण्यात आला होता. सुरक्षेसाठी शेकडोहून अधिक पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. वैद्यनाथ देवस्थान कमिटीच्या १२० सीसीटीव्ही कॅमेर्यांची परिसरात करडी नजर होती. महिला भाविकांसाठी वेगळी तर पुरुष भाविकांसाठी वेगळी रांग करण्यात आली होती. पासधारकांची वेगळी रांग असून या पाससाठी १०० रू शुल्क आकारले गेले आहे. वैद्यनाथ देवस्थान कमिटीकडूनही मंदिरात स्वयंसेवक कार्यरत आहेत. तसेच विविध शासकीय निम शासकीय कार्यालया मार्फत आलेल्या भक्तांना फराळाचे वाटप तसेच विविध राजकीय पक्षाच्या वतीने पाणी व फराळाच वाटप करण्यात आले. फराळाचा लाभ हजारो भाविक भक्तांनी घेतला.मंदिर परिसरात बाहेर गावाहून आलेल्या भाविकांच्या सामान, तसेच मोबाईल पर्स, चप्पल ठेवण्याची व्यवस्थ करण्यात आली होती. आलेल्या भाविकांची कसलीही गैरसोय होणार नाही. याची दक्षता देवल कमिटी, पोलीस प्रशासह, नगरपालिका, स्वयंसेवी संस्था तसेच नागरिकानी घेतली. भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या रांगा लावलेल्या होत्या. वैद्यनाथ भगवान की जय, हर हर महादेव, शंकर भगवान की जयच्या जयघोषानी

# कालव्यात कार कोसळली, तरुण बेपत्ता

मंचर । प्रतिनिधी वळणावर चालकाचा ताबा सुटल्याने कार हुतात्मा बाबू गेनू सागराच्या (डिंभे धरण) डावा कालव्यात पडली. या कारमधील एक जण सुखरूप बाहेर आला, तर दुसरा तरुण बेपत्ता झाला आहे. चास-ठाकरवाडी (ता. आंबेगाव) येथील कोंबडवाडी हद्दीत रविवारी (दि. २३) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. वैभव मोरे (वय २८) असे बेपत्ता झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर प्रवीण घाणेकर (वय २३) हा या अपघातातून बचावला आहे. नारोडी येथून वैभव व प्रवीण हे दोघे कार मधून जात होते. वैभव कार चालवित होता.



चास गाव पार केल्यानंतर ठाकरवाडी रस्त्याने गिरवलीकडे जात असताना कोंबडवाडी हद्दीत वळणावर वैभवचा कारवरील ताबा सुटल्याने कार थेट डिंभे धरणाच्या डाव्या कालव्यात कोसळली. या वेळी प्रवीण कारमधून बाहेर आला. मात्र वैभव बाहेर आला नाही. प्रवीणने मदतीसाठी जवळच असलेल्या बंगल्याकडे धाव घेत घटनेची माहिती दिली. गणेश ज्ञानेश्वर बारवे, राजेश रोहिदास बारवे, विपूल ज्ञानेश्वर बारवे, रोहित हरिचंद्र बारवे, ठकसेन किसन गुंड व संकेत ठकसेन गुंड आदी तरुणांनी कालव्यातून कार बाहेर काढली. त्यासाठी सत्यवान पोपट बारवे यांनी ट्रॅक्टर उपलब्ध करून दिला. परंतु वैभव मिळून आला नाही. त्याचा परिसरात शोध घेतला, पण त्याचा शोध लागला नाही. प्रवीणने वैभव बेपत्ता झाल्याची फिर्याद घोडेगाव पोलिस ठाण्यात दिली आहे. कालवा पूर्ण क्षमतेने भरून वाहत असल्याने शोधकार्यात अडथळे येत होते. त्यामुळे जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी दत्ता कोकणे यांनी कालव्यातील पाणी बंद केले. दरम्यान घोडेगाव पोलिसांना रवींद्र जगन्नाथ चासकर आणि पोलिस पाटील वैभव शेगर पाटील यांनी माहिती दिली. त्यानुसार सहायक पोलिस निरीक्षक किरण भालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार समीर कांबळे, नामदेव डेंगळे व माणिक मुळूक यांनी घटनास्थळी दाखल होत पाहणी केली. वैभवचे मूळगाव नारोडी (ता. आंबेगाव) असून, तो सध्या मुंबई येथे राहत होता. त्याचा दादर येथे कॅन्टीनचा व्यवसाय आहे. त्याचा रविवारी (दि. ९) साखरपुडा झाला होता. सोमवारी (दि. २४) विवाहाची तारीख ठरवली जाणार होती

## विद्यार्थ्यांचे उद्देश केंद्रित असावे -डॉ.धम्मपाल घुंबरे

अंबाजोगाई । प्रतिनिधी खोलेश्वर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्या वाणिज्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन दि.२४ फेब्रू.२०२५ रोजी डॉ. धम्मपाल घुंबरे यांच्या हस्ते कै. गोपीनाथराव मुंडे सभागृहात पार पडले याप्रसंगी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते, पुढे बोलताना ते म्हणाले विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनामध्ये शिक्षण घेत असताना विविध गोष्टींचा सखोल अभ्यास व खडतर परिश्रम करण्याची तयारी ठेवली तर नक्कीच यश मिळेल.ध्येयनिश्चिती करून खडतर प्रयत्न केले व त्यानुसार मार्गक्रमण केले तर यश निश्चितच मिळते यासोबतच उद्देश निश्चिती करत असताना आयुष्यात नक्की आपल्याला काय साध्य करायचे याचे देखील भान विद्यार्थ्यांना



असणे गरजेचे आहे याबाबतचे सखोल मार्गदर्शन विविध उदाहरणाच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दीपक फुलारी यांनी भुषविले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना त्यांनी वेगवेगळया कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमांचा आपल्या दैनंदिन जीवनामध्ये उपयोग करून यशस्वी कसे होता येईल याकडे लक्ष वेधले ,यासोबतच या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या उद्योगात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर व आत्मनिर्भर भारत या विषयावरील भित्तीपत्रकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रक विद्यार्थासमोर सादर केले त्यानंतर वाणिज्य अभ्यास मंडळ वर्ष २०२४ -२५ च्या नवनिर्वाचित सदस्यांचे स्वागत मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुभाष पटेकर यांनी केले, कार्यक्रमाचे संचलन कु.आकांक्षा पौळ व कु.अंकिता देशमाने यांनी केले तर आभार कु. काजल चव्हाण यांनी मानले, या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाणिज्य विभागाच्या सर्व प्राध्यापक बंधू भगिनींनी प्रयत्न केले,

## नटेश्वर बेदरकर यांच्या अचानक गायब होण्याने खळबळ



माजलगाव । तालुक्यातील हारकी लिमगाव येथील शेतकरी नटेश्वर मुकुंद बेदरकर हे दि. २२ फेब्रुवारी रोजी अचानक गायब झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, या प्रकरणी पोलीस स्थानकात रितसर तक्रार नोंदविली आहे. या बाबत अधिक माहिती अशी की, माजलगाव तालुक्यातील हारकी लिमगाव येथील रहिवाशी नटेश्वर मुकुंद बेदरकर (वय ३९) हे शनिवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते ९:४५ वाजेच्या सुमारास बीड येथून गायब झाले आहेत. या प्रकरणाने खळबळ उडाली असून त्यांच्या गायब झाल्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाणे बीड येथे बेदरकर कुटुंबियांनी रितसर तक्रार दाखल केली आह

# महा-ई-सेवा केंद्र चालकाने भाव फलक लावावे : पुलकित सिंह

अंबड ।प्रतिनिधी जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी येथील महा-ई-सेवा केंद्र चालकांना आता चांगलाच आर्थिक नुकसान होणार आहे.त्यामुळे लाभार्थ्यांचा देखील मोठा फायदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गेल्या अनेक दिवसापासून महा-ई-सेवा केंद्र चालक लाभार्थ्यांची लूट करत असल्याचे उपविभागीय अधिकारी अंबड यांच्या लक्षात येताच त्यांनी अंबड व घनसावंगी तालुक्यातील सर्वच सीएससी सेंटर, महा-ई-सेवा केंद्र यांना आपल्या मार्फत देण्यात येणाऱ्या शासनाच्या सर्व सोयी सुविधा यांचे फलक लावणे अत्यंत गरजेचे आहे. शासनाने नेमून दिलेले दराप्रमाणे जर जास्तीचे पैसे घेतल्यास संबंधितावर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी सांगितले आहे. त्यामध्ये ते म्हणाले आहे की महा-ई-सेवा केंद्र व सीएससी सेंटर यांच्यामार्फत कोणत्याही लाभार्थ्यांचे जात प्रमाणपत्र असेल नॉन क्रिमिनल व इतर महत्त्वाचे कागदपत्र ऑनलाइन प्रणालीवर केल्यानंतर तत्काळ त्यांनी संपूर्ण संचिका कार्यालयात आणून देण्यात



यावी असे देखील म्हटले आहे. जेणेकरून लाभार्थ्यांना होणारा त्रास कमी होईल आणि २४ तासाच्या आत त्यांना प्रमाणपत्र अदा करण्यात येईल असे म्हटले आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालय, अंबड यांनी दि. १०/०२/२०२५ ते २५/०२/२०२५ या दोन आठवड्याच्या कालावधीत विशेष मोहीम राबवुन कार्यालयात घनसावंगी व अंबड तालुक्यातील प्रलंबित असलेले १४७२ जातप्रमाणपत्र तसेच छेपडीशशू श्रूशी प्रमाणपत्र निर्णय घेवुन निर्गमीत करण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालय अंबड येथे नविन जात प्रमाणपत्रासाठी प्राप्त अर्जावर २४ तासाच्या आत कारवाही करण्यात येत आहे. अर्जदाराच्या अर्जावर कारवाहीसाठी विलंब जर होत असेल तर अर्जदार यानी स्वतः उपविभागीय अधिकारी अंबड यांना भेटावे असे सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अंबड श्री पुलकित सिंह यांनी जनतेला आव्हान केले आहे.महा-ई-सेवा तर्फे अर्जदार यांनी त्यांच्या दुकानासमोर लावण्यात आलेल्या भाव फलका नुसारच अर्ज करण्याची फी द्यावी, जास्तीची फी जर कोणी घेत असेल ज तर त्याबाबत संबंधित तहसिलदार यांच्याकडे व माझ्याकडे तक्रार करायी. त्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात येईल असे उपविभागीय अधिकारी यांनी सांगितले आहे.

# मोहनराव जगताप यांनी अठरा पगड जाती, धर्माच्या लोकांत मिसळून लोकप्रितेचा गाठला उच्चांक.

## लोकप्रियते मुळे मोहनराव जगताप यांची सुसाट गाडी विधानसभा कडे

माजलगाव (प्रतिनिधी) नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत मोहनराव जगताप यांचा थोड्या फार मतांनी पराभव स्वीकारावा लागला. मात्र निवडणूक लढवून लोकांच्या मनात आदराचे आणि विश्वासाचे घर मोहनराव जगताप यांनी निर्माण केले.४० वर्ष सत्तेत असणाऱ्या आ. प्रकाश दादा सोळंके यांना पाहिजे तेवढी लीड मिळवता आली नाही. मात्र पहिल्यांदाच विधानसभेची निवडणूक लढवून आगामी पंचवार्षिक निवडणुकीचे चित्र स्पष्ट करून ठेवले. आणि स्वतः आत्मविश्र्वास निर्माण केला की, आगामी पंचवार्षिक विधानसभेचा सदस्य मीच असणार हे जेवढे त्यांना वाटते तेवढे त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या जनतेला वाटू लागले आहे.

माजी आमदार बाजीराव भाऊ जगताप हे व्यक्तिमहत्त्व गोरगरीब, लोकांना सांभाळणारे, याच धर्तीवर मोहनराव जगताप यांनी वसा पुढे ठेवला,मतदारसंघातील लोकांच्या सुख दुःखात सहभाग



नोंदवून त्यांच्या आनंदात, दुःखात सामील होऊन कुटुंबातील सदस्य सारखी वागणूक निर्माण केली. यामुळे सर्व जाती धम र्तील अठरा पगड जाती धर्माच्या लोकांना मोहनराव जगताप हे आपल्या कुटुंबातील सदस्य असल्याची जाणीव निर्माण केली. यामुळे मोहनराव जगताप यांची लोकप्रियता दिवसा नि दिवस वाढत आहे

.मोहनराव जगताप यांचा म तदानानी पराभव झाला असला तरी ही लोकांच्या मनात म ोहनराव जगताप हे विजयी झाले आहेत. पहिल्याच निवडणुकीत मोहनराव जगताप यांनी जोरदार एन्ट्री मारल्यामुळे लोका मध्ये मोहनराव जगताप यांची क्रेझ वाढली आहे.

दिलेले वचन पाळणे, दिलेल्या शब्दाला जागने ही मोहनराव जगताप यांची सचोटी असल्याम ुळे लोकांच्या मनात मोहनराव जगताप यांनी घर केले आहे. कटू सत्य उराशी बाळगून जनतेच्या सेवेत राहत गेल्यामुळे लोकांनी कधी त्यांना दुरावा जाणुदिला नाही. याचे फलित विधानसभे मध्ये दिसून आले. सत्तेत असू या नसून जनसेवे मध्ये सदैव कार्यरत राहिल्यामुळे जनता त्यांना चिटकून राहिली. हीच जनतेची विश्वास हर्ता मोहनराव जगताप यांना त्यांच्या ध्येया पर्यंत पहोचणार यात तिळ मात्र शंका नाही. या जनतेच्या प्रेमा पोटी व जनतेच्या आशीर्वादामुळे मोहनराव जगताप यांची गाडी विधानसभेच्या वाटेने सुसाट सुटली आहे. यश निश्चित मि ळेल यात मात्र शंका नसल्याचे जनतेच्या गोठ्यातून बोललेले जात आहे.

## निर्लज्ज नगरपरिषद प्रशासनाची गुड मॉर्निंग ग्रुपने लाज राखली

बीड । प्रतिनिधी बीड शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणांवर सकाळी आणि सायंकाळी व्यायाम करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना नगरपरिषद प्रशासनाने बसवलेले साहित्य मोडकळीस आले होते यामुळे व्यायाम करणारांची हेळसांड होत होती. मोडकळीस आलेल्या जिमच्या साहित्याची दुरुस्ती करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून शासकीय ध्वजारोहणा साठी आलेले क्रिडा मंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन दिले होते. निवेदन अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नरेंद्र कुलकर्णी यांनी मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत लेखी कळवले होते. मात्र नेहमीप्रमाणेच नगरपरिषद प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले. व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांची हेळसांड लक्षात घेऊन ङ्गङ्घगुड मॉर्निंग ङ्गङ्घ ग्रुपच्या सदस्यांनी सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घेत आणि स्वखर्चाने सगळ्या साहित्यांची दुरुस्ती करून घेतली.त्यामुळे एकंदरीतच निर्लज्ज नगरपरिषद प्रशासनाची गुड मॉर्निंग ग्रुपने लाज राखली अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली. गुड मॉर्निंग ग्रुपच्या या सामाजिक कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. बीड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणावर सकाळी आणि सायंकाळी नागरीकांची गर्दी असते.व्यायामाच्या दृष्टीने अनेक नागरिक याठिकाणी येतात. अशा नागरीकांसाठी व्यायाम करण्यासाठी काही वर्षापुर्वी ओपन जिमचे साहित्य बसविण्यात आले होते. या साहित्याची कित्येक महिन्यांपासून मोडतोड झालेली होती.अनेक साहित्य मोडकळीस आलेले होत

## श्री गुप्तेश्वर देवस्थान मंदिरात महाशिवरात्री निमित्त शिवशक्ती महायज्ञ सोहळा



घनसांगवी ।प्रतिनिधी घनसावंगी तालुक्यातील भेंडाळा -विरेगव्हाण तांडा येथील श्री गुप्तेश्वर देवस्थान मंदिरात दि.२६ व २७ फेब्रुवारी दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या निमित्ताने मंदिराच्या प्रांगणात भव्य मंडपाची उभारणी करण्यात आलेली आहे. यामध्ये दि.२६ रोजी भव्य २१ कुंडी शिवशक्ती महायज्ञ सोहळा, महाशिवरात्री उत्सव,यज्ञकार्य, दिपोत्सव,रात्री श्री ची महापूजा व शिव पार्वती विवाह सोहळा पार पडणार आहे.तर दि.२७ रोजी यज्ञ महापूर्णाहूती ,महाआरती व त्यांनतर महाप्रसाद वाटपाने या कार्यक्रमांची सांगता होणार आहे.या महायज्ञात सहभागी होण्यासाठी नावनोंदणी करावी.तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी आयोजित महायज्ञ सोहळ्यात उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री गुप्तेश्वर देवस्थान संस्थानचे श्री.तात्या महाराज सुराशे, सोहम चैतन्य आनंद परिवार, श्री गुप्तेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट व भेंडाळा विरेगव्हाण तांडा येथील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अनिलदादांनी पालकत्व स्विकारून बीडमध्ये युवासेना मजबूत करावी - निलेश शिंदे

### युवा विजय मराठवाडा दौऱ्यात बीडमध्ये पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न

बीड ।प्रतिनिधी हिंदुहृदयसम्राट आदरणीय बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांचा आशीर्वाद घेऊन महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख पुर्वेशजी सरनाईक साहेब यांच्या मार्गदर्शन नेतृत्वाखाली युवासेना आयोजित युवाविजय मराठवाडा दौरा पार पडतो आहे. या दौऱ्यात ठिकठिकाणी पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठका देखील घेण्यात येत आहे. अगदी याप्रमाणेच बीडमध्ये देखील युवाविजय दौऱ्यातील आढावा बैठका संपन्न होत आहेत. शिवसेना पक्षाला ताकद देण्यासाठी, पक्षाची ताकद वाढविण्यासाठी आम्ही सर्व युवांनी वज्रमुठ आवळली असून आता चाळीस वर्ष राजकारणात राहून शिवसेना पक्ष बांधणीसाठी सर्वोपरी योगदान देणारे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी एक मोठा भाऊ या नात्याने बीड जिल्हा युवासेनेचे पालकत्व स्वीकारून युवासेना मजबूत करावी असे अहवान युवसेना मराठवाडा सचिव निलेश भाऊ शिंदे यांनी युवाविजय मराठवाडा दौऱ्याच्या पदाधिकारी आढावा बैठकीत केले. काल दि. २५ फेब्रुवारी रोजी बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे युवाविजय मराठवाडा



दौऱ्यातील पदाधिकारी आढावा बैठक संपन्न झाली. या आढावा बैठकीसाठी युवासेना मराठवाडा सचिव निलेश भाऊ शिंदे, युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, युवासेना मराठवाडा युवती निरीक्षक आकांक्षाताई चौगुले, युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख स्वप्नील भैय्या गलधर उपस्थित होते. जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवासेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांनी आपल्या प्रस्ताविकता शिवसेना, युवासेना पदाधिकाऱ्यांचं स्वागत करत युवासेनेच्या कार्याचा आढावा मांडला व पुढील वाटचालीसाठी आम्हाला सहकार्य मार्गदर्शनाची आवश्यकता असून आम्ही पूर्ण ताकदीने बीड जिल्ह्यात युवासेनेची ताकद वाढवू असा शब्द दिला. युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी आपल्या भाषणामध्ये अनिल दादा हे मला गुरुस्थानी असल्याचे नमूद केले

# क्रांतिकारीकांचे प्रेरणास्थान म्हणजेच स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर होय - डॉ. मुकुंद देवर्षी

माजलगाव प्रतिनिधी दिनांक २५/०२/२०२५क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान म्हणजेच वि.दा. सावरकर होय असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित स्वातंत्र्यवीर सावरकर आत्मार्पण दिन व देहदान, नेत्रदान संकल्प मोहिम कार्यक्रमात ते बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की, स्वतंत्र्यवीर वि.दा. सावरकर हे एक बहुआयामी असं व्यक्तिमत्व होतं. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू आपणास सांगता येतील. ज्यामध्ये क्रांतिकारक सावरकर, शतपैलू सावरकर, पत्रकार सावरकर, साहित्यिक सावरकर, भाषाशुद्धीकार सावरकर, क्रांतिकारकांचे मेरुमणी म्हणजेच सावरकर, हिंदू महासभेचे उद्धोषक म्हणजे सावरकर आणि अशा अनेक पैलूंचा अभ्यास आपण केलात तर एक मोठा खंड प्रकाशित होऊ शकतो. त्यांची ग्रंथ संपदा ही खूप मोठी होती. उत्कृष्ट वाकब शैली व प्रगल्भ विचार शक्ती असणारे असे हे व्यक्तिमत्व होते. अलीकडच्या काळात त्यांच्याविषयी प्रेम करणारे लोक पाहता त्यांच्या प्रत्येक अंगाचा अभ्यास होतो आहे. व त्यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार समाजात होत आहे ही खूप भाग्याची गोष्ट म्हटली तरी वावगी ठरणार नाही. खरं तर राष्ट्रवादी विचारांनी भारावलेल्या या महापुरुषांने भारत मातेच्या उन्नतीचे स्वप्न पाहिलं होतं परंतु अलीकडच्या



काळातील दुर्दैव असे आहे की या म हान चरित्रातून प्रेरणा घेण्यापेक्षा वादच जास्त निर्माण केले जातात आणि त्यांच्या ख-- प्रयत्न होतो आणि म्हणून आपल्यासारख्या बुद्धिमान विचारवंतांनी त्यांच्या सकारात्मक पैलूंचा प्रचार व प्रसार समाजात केला पाहिजे. सावरकर यांनी आत्महत्या केली असा भास समाजात निर्माण केला जातो. परंतु ती आत्महत्या नव्हती तर त्यांनी स्वतःहून अशा पद्धतीने ठरवलं होतं की आता माझं जे ठरवलेलं कार्य आहे ते कार्य आता संपले आहे. म्हणून मी माझा देह भारतभूमीसाठी त्याग करणार आहे. आणि ते ठरवत असताना त्यांनी आपल्या सहजनांना हे सांगितल ही होतं. ठराविक कालावधीनंतर मी अन्न त्याग करणार आहे. त्यानंतर दूध प्राशन करण बंद करणार आहे. तद्नंतर पाणी पिणेही बंद करणार आहे. त्याच पद्धतीने हळूहळू करत-करत आपला देह मातृभूमीच्या चरणी त्यांनी ठेवला. तोच दिवस म्हणजे आत्मार्पण दिवस होय. म्हणून त्यानिमित्ताने राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या या विभागांच्या वतीने नेत्रदान व देहदान करण्याची मोहीम राबवण्यात येत आहे. प्रत्येक सुजाण नागरिकांनी गरज आहे म्हणून नेत्रदान व देहदानाचा संकल्प करावा आणि तशा पद्धतीने मरणोत्तर कोणाच्यातरी उपयोगाला आपला देह येऊ द्यावा. या पद्धतीची जनजागृतीची मोहीम राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यम ातून देशभर सरकार राबवत आहे. असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी नेत्रदान व देहदान करण्याविषयीची शपथ उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये यांनी दिली. तसा संकल्प महाविद्यालयातील सर्व कर्मचा-यांनी याप्रसंगी केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनील पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, उत्तमचंद बगडिया महाविद्यालय रिसोड जिल्हा वाशिमचे प्राचार्य डॉ. विनोद कुलकर्णी, सावरकर महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.चौधरी व विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.

# जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड ।प्रतिनिधी मराठा, ओबीसी,धनगर समाजाच्या वतीने आरक्षण मागणी अनुषंगाने आंदोलने चालु आहेत.तसेच मराठा आरक्षणाचे मागणीवरुन मनोज जरांगे हे दि. २५ जानेवारीपासून मराठा समाजाला सोबत घेऊन सामुहिक आमरण उपोषणास बसले आहेत. सध्या बीड जिल्हयात पोलीस स्टेशन केज येथे दाखल असलेल्य गुन्हयाच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष संघटना यांच्याकडून सदर गुन्हयाच्या अनुषंगाने आरोपीनां कठोर शासन व्हावे या मागणीकरिता अचानक आंदोलन करत आहेत. राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागणीसाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यदी होण्याची शक्यता आहे. तसेच दि. ११ फेब्रुवारी २०२५ पासून इयत्ता १० वी आणि २१ फेब्रुवारीपासून १२ वी बोर्डाची परिक्षा सुरु होत आहेत. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते १ मार्च २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा- या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही,

# छत्रपती शिवाजी महाराज बद्दल अपशब्द बोलणाऱ्या कोरटकर वर तात्काळ कारवाई करा - मराठा क्रांती मोर्चा

पैठण ।प्रतिनिधी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या जवळ जय शिवराय च्या घोषणा देऊन कोरटकर यांच्या निषेधार्थ पैठण पोलीस स्टेशनचे पोलीस सहाय्यक निरीक्षक संजय देशमुख यांना निवेदन देण्यात आले. प्रशांत कोरटकर यांनी इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना फोन कॉल करून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व मांसाहेब जिजाऊ यांच्याबद्दल हिणकस व गलिच्छ वक्तव्ये करून बदनामी केली आहे. तसेच संबंधित व्यक्तीने विकृत लेखक जेम्स लेन याने केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आणि मांसाहेब जिजाऊ यांच्याबद्दलच्या अत्यंत विकृत लिखाणाचे समर्थन करून तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत.सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिली. राज्य सरकार, गृह विभाग व पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रशांत कोरटकर नागपूर



या व्यक्तीवर तात्काळ गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी आणि त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी. या प्रकरणाबाबत गुन्हा दाखल करून घेण्यात किंवा कारवाई करण्याबाबत गांभीर्य दाखवले नाही तर सर्व शिवप्रेमींच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन करून अत्यंत आक्रमक प्रतिक्रिया दिल्या जातील, शिवछत्रपतींचा अपमान करणाऱ्या कोरटकर वर कायदेशीर कारवाई करा छत्रपती शिवराय,जिजाऊ मासाहेब व शंभूराजे विषयी आक्षेपार्ह बोलणाऱ्या प्रशांत कोरटकर याच्या निषेधार्थ मराठा क्रांती मोर्चा पैठण च्या वतीने कोरटकर च्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करत प्रतिमा जाळून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी कोरटकर याच्यावर कायदेशीर कारवाई करावी असे निवेदन पैठण पोलिस ठाण्याचे निरीक्षक संजय देशमुख यांना देण्यात आले यावेळी ,साईनाथ कर्डिले,अतिश गायकवाड किशोर सदावर्ते, सुभाष नवथर,अंकुश काळे, रामेश्वर बावणे, विशाल काळे, राम भुकेले,प्रणित निकाळजे,शिवाजी गिरीजे, श्याम तावरे, ईश्वर जाधव,बंडू निवारे, चिराग फारोकी, सुधाकर सुलताने, आदित्य चन्ने,जिजा कर्डिले, अभिजीत शिंदे, दिनेश औटी, योगेश म्हात्रे, निसार बागवान, प्रशांत देशमुख, पांडुरंग शेळके आदींची उपस्थिती होती.

# किनवट तालुक्यात अंगणवाडी सेविका व मदतनीस पदाची भरती प्रक्रिया सुरु

### दलालांच्या भूलथापांना बळी न पडता अर्ज करावे : अश्विनी ठकरोड

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : तालुक्यामध्ये एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प किनवट (दक्षिण) व प्रकल्प किनवट (उत्तर) या कार्यालयाचे अंतर्गत रिक्त असणा-या अंगणवाडी सेविका व मदतनीस पदांची भरती प्रक्रिया सुरू आहे. पात्र उमेदवारांनी या पदासाठी गुरुवारी (ता. २८ फेब्रुवारी २०२५ ) पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन किनवट (दक्षिण) व (उत्तर) च्या बाल विकास प्रकल्प अधिकारी अश्विनी ठकरोड यांनी केले आहे.

या पदासाठीची किमान शैक्षणिक अर्हता बारावी उत्तीर्ण. वय १८ वर्षे ते ३५ वर्ष दरम्यान असून विधवा महिलांसाठी कमाल वयोमर्यादा ४० वर्षे राहणार आहे. उमेदवार हा रिक्त पद असलेल्या अंगणवाडी गावचा रहिवासी असावा. इच्छुक व पात्र गरजू महिला उमेदवारांनी ता. २८ फेब्रुवारी २०२५ या अंतिम तारखेस कार्यालयीन वेळेत एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प किनवट (दक्षिण) व प्रकल्प किनवट (उत्तर) या कार्यालयात विहीत नमुन्यात अर्ज करावेत.

प्रकल्प किनवट (दक्षिण)अंतर्गत : रिक्त पद असलेल्या अंगणवाडी केंद्राचे नाव : मलकजाम तांडा , अमलापूर , आंदबोरी तांडा मिनी , अप्पारावपेठ क्र.१ , दुर्गानगर मिनी , गोंडेमहागाव मिनी , मार्लागुंड क्र.२ , मार्लागुंडा मिनी , व्यंकटपूर मिनी , बोधडी बु. क्र.२ , चिंचोली मिनी , सिंदगी , सिंदगी तांडा मिनी , बोधडी बु. क्र.११ , चिखली बु. क्र.१ , दहेगाव , पोतरेड्डी , प्रधान सांगवी , आंदबोरी तांडा मिनी , चिखली तांडा मिनी , दहेगाव मिनी , गोकुळनगर मिनी , हिप्पागुडा मिनी, मरकागुडा , खैरगुडा मिनी , नंदगाव तांडा ०१, परोटी तांडा ०१, परोटी क्र. ०१, सांगवी , इस्लापूर क्र. ०९, भुजंगनगर मिनी , इरेगाव , सहस्रकुंड मिनी , रोडा नाईक तांडा , करंजी , आनंदनगर , नखातेवाडी मिनी , तळ्याचीवाडी मिनी , वाळकी खु., सावरीक्र.१, सावरी मिनी , दिग्रसतांडा मि नी , सिंगारवाडी मिनी , उमरवाडी मिनी , रिठातांडा क्र.१, माळकोल्हारी , भंडारवाडी मिनी , धानोरा तांडा क्र.२ , कोपरा क्र. २ , नागशवाडी मिनी , पेंदा , सावरगाव मि नी, सावरगाव , वाघदरी , मानसिंग नाईक तांडा मिनी , आलुराम तांडा , दिपलानाईक तांडा मिनी ,दिपलानाईक तांडा क्र.१ , दयाळधानोरा मिनी , गोंडजेवली क्र.२, मानसिंगनाईक तांडा , मानसिंगनाईक तांडा मिनी, रामन्नानाईक तांडा मिनी , शिवणी मिनी , तोटंबा , तल्हारी मिनी , सेवादास तांडा मिनी , कुपटी खु. क्र.१ या ठिकाणी (जाहिरातीत दर्शविल्याप्रमाणे) अंगणवाडी सेविका व मदतनीस रिक्त पदासाठी आणि

प्रकल्प किनवट (उत्तर )अंतर्गत : रिक्त पद असलेल्या अंगणवाडी केंद्राचे नाव :झेंडीगुडा ,घोगरवाडी, शिवशक्तीनगर ,गोकुंदा क्र.४, गोकुंदा क्र. १७ ,नागझरी कॅम्प, हाटकरखोरी मिनी ,सोनापूर ,भिमपुर, पितांबरवाडी मिनी सिंदगी क्र.१ ,निचपूर.क्र.३,निचपूर क्र.५, फ ुलवाडी मिनी ,वरगुडा मिनी, शिवरामखेडा ,माळबोरगाव तांडा,अंबाडी क्र.२ ,पाथरी ,गौरी तांडा,भामपूर मिनी ,सारखणी मिनी ,देवीनगर मिनी ,चिंचखेड मिनी ,भरकतांडा मिनी, सलाईगुडा मिनी ,घोटी क्र.१, घोटी क्र.२, दत्तनगर , सिरमिटी , खेरडा , वडोली क्र.२ , लोणी क्र. २ ,गणेशपूर जुने ,रोहिदासतांडा, कमठाला तांडा ,नवाखेडा ,मलकापूर ,सांबरलोळी ,राजगड ,खेडी ,मोहाडा मिनी , पिंपळशेंडा ,पारडी गाव ,दरसांगवी.क्र.१, दरसांगवी.क्र.२, उत्तमनगर मिनी, बाबानाईक मिनी , रणजितांडा मिनी ,मथुरा तांडा मिनी ,मोहाडा तांडा ,पळशी डाग ,लालूनाईक तांडा ,टेंभी तांडा ,ठाकूरवाडी मि नी ,तलाईगुडा क्र.१ ,डोंगरगाव ,जरूरतांडा क्र.१, जरूरतांडा क्र.२ ,कनकीतांडा ,कोठारी मिनी, जमुनानगर, मिनकी , गणेशपूर, लेंडीगुडा , नागापूर पोंड , लिंमगुडा ,जरुरगाव , लक्ष्मीनगर या ठिकाणी जाहिर प्रगरणात दशविल्याप्रमाणे अंगणवाडी सेविका व म दतनीस रिक्त पदासाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे.

इच्छूक महिला उमेदवारांनी आवश्यक साक्षांकित कागदपत्रासह, स्वाक्षरीसह व विहीत नमुन्यात परिपूर्ण अर्ज कार्यालयात सादर करावेत. अंगणवाडी मिनी सेविका व मदतनीस भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे राबविण्यात येणार असून यात शासन निर्णयाचे व मा. आयुक्तालयाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करण्यात येणार आहे. कोणीही कोणत्याही दलालांच्या अमिषाला /भूलथापांना बळी न पडता आर्थिक व्यवहार करून फसवणूक करून घेऊ नये. असे आवाहन बाल विकास प्रकल्प अधिकारी अश्विनी ठकरोड यांनी केले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com